

के’सागर यांच्या प्रदीर्घ लेखनानुभवातून
अन् अव्याहत व्यासंगातून साकारलेल्या
संदर्भाची नववी सुधारित व विस्तारित आवृत्ती

# TET संपूर्ण मार्गदर्शक

## काही महत्त्वाच्या संज्ञा



| | |
|---|---|
| ब्राऊजर | वेबसाईटशी जोडते व पेज दाखविण्यास साहाय्य करते. |
| बीट | ०, १ अंकांनी बनलेले संगणकाचे मूळ एकक. |
| बाईट | ८ बिट्स म्हणजे एक बाईट होय. |
| वर्ड प्रोसेसर | लिखित कागदपत्र तयार करते. |
| प्रेझेंटेशन ग्राफिक्स | माहिती लोकांपर्यंत पोहोचविते. |
| रॅम | संगणक तात्पुरत्या सूचनांचा वापर करून काम पूर्ण करतो. |
| संगणकाचा बस | सीपीयू, सर्व इनपुट व आऊटपुट डिव्हाईसेस, मेमरी हे या समांतर वायरने जोडतात. |
| फिनवेअर | हार्डवेअरमधील सॉफ्टवेअर. |
| लिव्हवेअर | संगणकाचा वापर करणारे लोक. |
| कंपायलर | हाय लेव्हल लँग्वेजचे मशीन लँग्वेजमध्ये रूपांतर करणारा प्रोग्रॅम. |
| असेंब्लर | असेंब्ली लँग्वेजचे मशीन लँग्वेजमध्ये रूपांतर करणारा प्रोग्रॅम. |
| स्प्रेडशीट्स | अंकीय डेटाचे व्यवस्थापन, विश्लेषण करणारे प्रोग्रॅम. |
| विंडोज ८ | या ऑपरेटिंग सिस्टिमच्या प्लॅटफॉर्ममध्ये Android आणि ios, डिझाईन स्पर्श अनुकूलित (touch screen) विंडोजचा समावेश आहे. |
| विंडोज १० | सार्वत्रिक ॲप्ससाठी, मेट्रो-स्टाईल ॲप्सचा विस्तार, माउस ओरिएंटेड इंटरफेस आणि इनपुट डिव्हाइसेसवर आधारित टचस्क्रीन-ऑप्टिमाइझ केलेले इंटरफेस. |
| मायक्रोसेकंद | सेकंदाचा दहा लाखावा भाग. |
| नॅनोसेकंद | सेकंदाचा एक शतकोटीवा भाग. |
| पिकोसेकंद | सेकंदाचा एक दशअब्जावा भाग. |
| फाईल कॉम्प्रेशन | फाईलचा आकार कमी करते. |
| फाईल डिकॉम्प्रेशन | फाईलचा आकार मोठा करते. |
| LAN | लोकल एरिया नेटवर्क |
| HOME | घर व अपार्टमेंटमध्ये उपयोगी नेटवर्क. |
| WLAN | वायरलेस लोकल एरिया नेटवर्क. |
| PAN | पर्सनल एरिया नेटवर्क. डिजिटल उपकरणे जोडण्यासाठी उपयुक्त. |
| MAN | मेट्रोपोलिटन एरिया नेटवर्क. शहरांमध्ये उपयुक्त नेटवर्क. |
| WAN | वाईड एरिया नेटवर्क, देशव्यापी व जगव्यापी नेटवर्क. उदाहरणार्थ– इंटरनेट. |
| डेटाबेस | अनेक वापरकर्त्यांनी वापरलेला डेटाचा समूह. |
| नेटवर्किंग | जागतिक पातळीवर माहितीची देवाण- घेवाण. |
| एम कॉमर्स | सेल्युलर फोनच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार करणे. |
| व्हाईट नॉईज | कॉम्प्युटरचा प्रिंटर व विविध उपकरणाद्वारे होणारा आवाज. |
| सिम्प्युटर | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू या संस्थेने बनविलेला कमी किमतीचा कॉम्प्युटर. |
| ब्ल्यू टूथ | लघू रेडिओ ट्रान्समिटरद्वारे माहितीची आदानप्रदान करणारे साधन. |
| आरनेट | भारतातील पहिले नेटवर्क. |
| होमपेज | इंटरनेटवर असणाऱ्या वेबपेजवरील पहिले पेज. |
| ब्लॉग | इंटरनेटवरील व्यक्तिगत पत्रकारिता. |
| इंट्रानेट | विविध कॉम्प्युटर ज्यात जोडले जातात त्यास इंट्रानेट म्हणतात. |
| सर्फिंग | ब्राऊजर्सच्या मदतीने इंटरनेटवरील वेबपेजेस पाहता येतात. यास सर्फिंग म्हणतात. |
| इन्फोटेक | नवीन तंत्रज्ञान व माहिती जी उद्योगक्षेत्रात प्रवेश करते त्यास इन्फोटेक म्हणतात. |
| ISDN | USA कडून जी Internet firmes घेतली जाते. त्यास ISDN असे म्हणतात. |
| स्ट्रीमिंग मीडिया | ऑडिओ, व्हिडिओ व ॲनिमेशन स्वरूपातील आशय असणाऱ्या तंत्रज्ञानास स्ट्रीमिंग मीडिया म्हणतात. |
| स्पॅम | न मागितलेल्या परंतु मिळालेल्या ई-मेल्सला स्पॅम म्हणतात. |

के'सागरीय उद्‌धृत...

# TET

# संपूर्ण मार्गदर्शक

## पेपर पहिला व पेपर दुसरा

९ वी
सुधारित व विस्तारित आवृत्ती





लेखन–संपादन–संस्करण
के'सागर


२०२१ ते २०२५
पेपर–१ व पेपर–२
प्रश्नपत्रिका उत्तरांसह


K'Sagar PUBLICATIONS

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi
Maruti Temple, Pune - 411 030.
☎ 24450125, 24455435 9823118810

*Email : customer@ksagar.com*
*sales@ksagar.com*
*website : www.ksagar.com*

© K'Sagar Publications, Pune : 2014
Thoroughly Revised Ninth Edition : 2026
ISBN 978-81-940869-5-6

The name K'Sagar is registered
under the trade marks Act, 1999

**Printed at**
Shri Ganesh Enterprises
Dhayari, Pune.

**Typesetting**
K'Sagar Publications, Pune

**Cover Design**
K'Sagar Publications, Pune

**Price : 750/-**

**Our Firms**

**K'Sagar's House of Books**
39/1, Durga Chambers, Jogeshwari Mandir Lane,
Pune - 411002. ✆ (020) 24483166
9923906500 8087722277

**K'Sagar Book Centre**
Nutan Classic, 639 Narayana Peth,
Appa Balwant Chowk, Pune - 411030.
✆ (020) 24453065 9823121395 9545567862/63

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

**ससंदेह**

जेव्हा उपमेय कोणते व उपमान कोणते, असा संदेह निर्माण झाल्याचे व त्यामुळे मनाची द्विधा अवस्था झाल्याचे कल्पिले जाते, तेव्हा 'ससंदेह अलंकार' होतो. या अलंकाराची काही उदाहरणे पुढे दिली आहेत–

(1) पौर्णिमेच्या रात्री मी तिला पाहिले आणि मला
प्रश्न पडला चंद्र कोणता, हा की नभीचा?

(2) गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली।
स्वतंत्रते भगवती, तूच जी विलसतसे लाली।।

**अतिशयोक्ती**

जेव्हा उपमा, उत्प्रेक्षा, रूपक किंवा व्यतिरेक यांसारख्या अलंकारांत अतिशयोक्तीचा अतिरेक केला जातो किंवा अतिशयोक्तीला प्राधान्य दिले जाते तेव्हा 'अतिशयोक्ती' हाच एक अलंकार होतो. खाली अतिशयोक्ती अलंकाराची काही उदाहरणे दिली आहेत–

(1) आटपाट नगरात दुधाचे तळे, तळ्याच्या काठी पेढ्यांचे मळे।

(2) प्रिये, तू सांगशील तर तुझ्यासाठी मी चंद्र, सूर्य, तारेही तोडून आणीन.

(3) एकदा एका हत्तीने सुईच्या नेढ्यातून (सुईच्या नाकातून) उडी मारली; पण जवळच असलेल्या दुधाच्या पेल्यात पडून तो बुडून मेला.

**दृष्टान्त अलंकार**

जेव्हा एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिले जाते तेव्हा 'दृष्टान्त'हा अलंकार होतो. या अलंकारामध्ये साम्यवाचक शब्द नसतात. पुढे या अलंकाराची काही उदाहरणे दिली आहेत–

(1) लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।
ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार।

(2) दुष्ट मनुष्याला साधूच्या संगतीने साधुत्व येते. बरोबरच आहे, फुलाच्या संगतीने मातीला सुवास लागतो.

(3) कवी मोरोपंत म्हणतात– ''हे देवा, तू माझ्यावर रागावला आहेस असे म्हणावे का? छे! अमृत देणारी देवांची गाय कधी विषरूपी दूध देईल का?''

संपूर्ण मराठी
के'सागर
या पुस्तकातून
उद्धृत...



# के'सागरीय

गेल्या काही वर्षांपासून राज्यात शिक्षक पात्रता परीक्षा घेतली जात आहे. ही परीक्षा प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता पहिली ते पाचवी या वर्षांसाठी अध्यापन करू इच्छिणाऱ्या शिक्षकांसाठी व उच्च प्राथमिक स्तर म्हणजे इयत्ता सहावी ते आठवीसाठी अध्यापन करू इच्छिणाऱ्या शिक्षकां-साठी अशा एकूण दोन स्तरांवर घेतली जाणार आहे.

प्राथमिक स्तरासाठी– (१) बालमानस-शास्त्र व अध्यापनशास्त्र (२) भाषा पहिली (३) भाषा दुसरी (४) गणित आणि (५) परिसर अभ्यास अशा पाच घटकांतर्गत तर–

उच्च प्राथमिक स्तरासाठी– (१) बाल-मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र (२) भाषा पहिली (३) भाषा दुसरी (४) गणित व विज्ञान किंवा सामाजिक शास्त्रे या चार घटकांतर्गत विहित करण्यात आलेला पाठ्यक्रम अतिशय व्यापक व विस्तृत कक्षा असणारा आहे.

या दोन्ही स्तरांवरील अभ्यासक्रमाचा एकत्रित, साकल्याने व आगामी परीक्षेच्या दृष्टिकोनातून विचार करून प्रस्तुतच्या संदर्भाची रचना साकारली आहे. या दोन्ही परीक्षांचा व्यापक अभ्यासक्रम लक्षात घेऊन एकात्मिक व सर्वसमावेशक दृष्टिकोनातून पुस्तकाची रचना एकूण आठ विभागांत उपविषयनिहाय करण्यात आली आहे. प्रत्येक उपविषयास आपल्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून असलेले महत्त्व व त्या त्या उपविषयाची व्याप्ती लक्षात घेऊन प्रत्येक विभागात संबंधित उपविषयांतर्गत आवश्यक तितकी प्रकरणे दिली आहेत. संपूर्ण पुस्तक वस्तुनिष्ठ चार पर्यायी प्रश्नांच्या स्वरूपात असल्याने ते निश्चितच अधिक परीक्षाभिमुख बनले आहे.

आपल्या अभ्यासक्रमात बालमानसशास्त्र व अध्यापन पद्धती यांना दिलेले महत्त्व लक्षात घेऊन या उपविषयावरही विशेषत्वाने भरपूर व सर्वसमावेशक प्रश्न दिले आहेत. साधी-सोपी के'सागरीय भाषाशैली याही संदर्भात अगत्याने जपली आहे.

हा संदर्भ साकारताना पूर्वप्रकाशित अशा डी. एड. अभ्यासक्रम (प्रा. महाळंक), संपूर्ण शिक्षणशास्त्र (के'सागर) व इतर के'सागरीय ग्रंथांचा संदर्भ घेतला असल्याने या संदर्भांचा निर्देश येथे करणे मी अगत्याचे मानतो.

विद्यार्थिमित्रांच्या विश्वासास पात्र ठरलेला आणि आपली उपयुक्तता व विद्यार्थिप्रियता सिद्ध करणाऱ्या के'सागरीय लेखणीतून उतरलेला हा आगळावेगळा संदर्भही विद्यार्थिमित्रांना यशो-मंदिराकडे घेऊन जाणाऱ्या वाटा उजळील, यात शंकाच नाही.



**आपला,**

**व्ही. एस. क्षीरसागर**

**(K'Sagar)**

*Connect us :*

ksagarbooks

@ksagarfocus

ksagarpublications

YouTube Ksagar Career Academy

K'Sagar MPSC Update
Whatsapp Channel

# अनुक्रमणिका


## विभाग पहिला
## बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

| | |
|---|---|
| १. बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र वस्तुनिष्ठ प्रश्न | ११ |
| २. महत्त्वाचे संमिश्र प्रश्न पेपर १ व पेपर २ | ५८ |

## विभाग दुसरा
## प्राथमिक शिक्षण

| | |
|---|---|
| १. प्राथमिक शिक्षण वस्तुनिष्ठ प्रश्न | ७१ |

## विभाग तिसरा
## परिसर अभ्यास

| | |
|---|---|
| १. परिसर अभ्यास वस्तुनिष्ठ प्रश्न | १०७ |

## विभाग चौथा
## सामान्य विज्ञान

१. विज्ञान — १२७

- महत्त्वाची माहिती
- काही मूलद्रव्ये व संज्ञा
- काही पदार्थांचे द्रवणांक व उत्कलनांक
- अन्नातील पोषणद्रव्ये
- वक्र गोलाकार आरशाचे दोन प्रकार
- भिंगाचे प्रकार
- काही दृष्टिदोष

हे लक्षात ठेवा!

- रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र
- प्राणिशास्त्र व वनस्पतिशास्त्र
- शरीर आरोग्यशास्त्र
- संगणक विज्ञान
- वस्तुनिष्ठ प्रश्न
- स्पष्टीकरणे

## विभाग पाचवा
## भाषिक क्षमता मराठी

| | |
|---|---|
| १. समान अर्थाचे शब्द | १९५ |
| २. विरुद्ध अर्थाचे शब्द | २०२ |
| ३. अनेक शब्दांबद्दल एक शब्द | २०७ |
| ४. काही महत्त्वाचे शब्द व अर्थ | २१२ |
| ५. सारखे भासणारे भिन्न अर्थाचे शब्द | २१५ |
| ६. एकाच शब्दाचे अनेक अर्थ | २१९ |
| ७. काही महत्त्वाच्या म्हणी व अर्थ | २२१ |
| ८. वाक्प्रचार व अर्थ | २२५ |
| ९. आलंकारिक शब्द | २३१ |
| १०. मराठीचा शब्दसंग्रह | २३३ |
| ११. शब्दविचार | २३५ |
| १२. क्रियापदे | २३९ |
| १३. वाक्यांचे रूपांतर | २४२ |
| १४. संधी | २४६ |
| १५. विभक्ती | २५० |
| १६. समास | २५२ |
| १७. प्रयोग | २५६ |
| १८. मराठीतील लिंगविचार | २५८ |
| १९. मराठीतील वचनविचार | २६० |
| २०. विरामचिन्हे | २६२ |
| २१. लेखनातील काही सामान्य चुका | २६३ |
| २२. मराठी– भाषा पहिली व दुसरी | २६४ |

## विभाग सहावा
## इंग्रजी

| | |
|---|---|
| १. Comprehension | २८५ |
| २. Word Formation | २८८ |
| ३. Voice | २९३ |

| | |
|---|---|
| ४. Direct and Indirect Speech | २९७ |
| ५. Transformation of Sentences | ३०१ |
| ६. Prepositions | ३०७ |
| ७. Words Followed by Particular Prepositions | ३१२ |
| ८. Tenses | ३१५ |
| ९. Clauses | ३१८ |
| १०. Synonyms | ३२२ |
| ११. Antonyms | ३२५ |
| १२. Idioms and Phrases | ३२९ |
| १३. One Word Substitution | ३४२ |
| १४. Words Commonly Mis-spelt | ३४९ |
| १५. English Teaching Methods Questions | ३५१ |


## विभाग सातवा
## अंकगणित

**अंकगणिताची पायाभूत तयारी**

| | |
|---|---|
| १. संख्या | ३६५ |
| २. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार | ३६६ |
| ३. ल.सा.वि. आणि म.सा.वि. | ३६८ |
| ४. वर्ग–वर्गमूळ, घन–घनमूळ | ३६९ |
| ५. अपूर्णांक | ३७० |
| ६. दशांश अपूर्णांक | ३७१ |
| ७. घातांक | ३७३ |
| ८. पदावली | ३७४ |
| ९. सरळव्याज व चक्रवाढ व्याज | ३७५ |
| १०. शेकडेवारी | ३७७ |
| ११. गुणोत्तर व प्रमाण | ३७७ |
| १२. सरासरी | ३७८ |
| १३. शेअर व दलाली | ३७८ |
| १४. विविध परिमाणे | ३८० |
| १५. नफा–तोटा | ३८१ |
| १६. काळ – काम – वेग | ३८३ |
| १७. बैजिक राशींची किंमत | ३८५ |
| १८. बहुपदी | ३८५ |
| १९. समीकरणे आणि त्यांची उकल | ३८७ |
| २०. भूमितीतील मूलभूत संबोध | ३८८ |
| २१. काटकोन त्रिकोण, पायथागोरसचे प्रमेय | ३९० |
| २२. त्रिकोणमिती | ३९३ |
| २३. क्षेत्रफळ | ३९५ |
| २४. पृष्ठफळ, घनफळ | ३९७ |
| २५. आलेख | ३९९ |
| २६. गणित अध्यापन पद्धती वस्तुनिष्ठ प्रश्न | ४०४ |


## विभाग आठवा
## सामाजिक शास्त्रे

| | |
|---|---|
| **१. प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास**<br>■ हे लक्षात ठेवा! | ४१३ |
| **२. आधुनिक भारताचा इतिहास**<br>■ आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास<br>■ महाराष्ट्रातील समाजसुधारक<br>■ निवडक महत्त्वाचे प्रश्न | ४२६ |
| **३. पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश**<br>■ सूर्यकुल<br>■ पृथ्वी<br>■ जगाचे नैसर्गिक विभाग<br>■ महत्त्वाच्या नोंदी<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ४४० |
| **४. भारत— भूगोल, अर्थ, योजना, उद्योग व विकास**<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ४५८ |

| | |
|---|---|
| ५. **महाराष्ट्राचा भूगोल व महाराष्ट्रविषयक सामान्यज्ञान**<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ४८१ |
| ६. **भारतीय राज्यघटना**<br>भारतीय राज्यघटना<br>■ महत्त्वाच्या टीपा<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ५०४ |
| ७. **पंचायतराज**<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ५२० |
| ८. **ग्रामीण भागातील मुलकी व पोलीस प्रशासन**<br>■ हे लक्षात ठेवा!<br>■ वस्तुनिष्ठ प्रश्न | ५३४ |
| **विभाग नववा**<br>**टीईटी पेपर पहिला व पेपर दुसरा** | |
| १. **TET पेपर पहिला २०२५** | ५३७ |
| २. **TET पेपर दुसरा २०२५** | ५४९ |
| ३. **TET पेपर पहिला २०२४** | ५६७ |
| ४. **TET पेपर दुसरा २०२४** | ५८१ |
| ५. **TET पेपर पहिला २०२१ (इयत्ता १ ली ते ५ वी)** | ५९८ |
| ६. **TET पेपर दुसरा २०२१ (इयत्ता ६ वी ते ८ वी)** | ६१२ |

### महत्त्वाचा बदल

औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव, अहमदनगरचे अहिल्यानगर, वेल्ह्याचे राजगड याप्रमाणे नामांतर केले गेले आहे. विद्यार्थिमित्रांनी कृपया वरील बदलांची नोंद घ्यावी. या पुस्तकात जेथे जुन्या नावांचा उल्लेख असेल तेथे कृपया योग्य ते बदल करून घेऊन सहकार्य करावे, ही विनंती.

ओरिसा–ओडिशा, अलाहाबाद–प्रयागराज, मद्रास–चेन्नई, बंगळुरू–बेंगळुरू, विजापूर–विजयपुरा, बेळगाव–बेळगावी, कलकत्ता–कोलकाता हा बदलही लक्षात घ्यावा.

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९

भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणून 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' या अधिनियमाचा उल्लेख करावा लागेल.

**कायद्याची आवश्यकता**

आधुनिक काळात शिक्षणाला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेता शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क मानण्यात यावा अशी मागणी बऱ्याच दिवसांपासून करण्यात येत होती. या मागणीची उचित दखल घेऊन भारतीय संसदेने सन २००२ मध्ये शहाऐंशीवा घटनादुरुस्ती कायदा संमत केला. या घटनादुरुस्ती कायद्यान्वये भारतीय राज्यघटनेत '२१ ए' हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यातील तरतुदीनुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळणे हा आता ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मूलभूत हक्क ठरला आहे. तथापि, राज्यघटनेत दिलेल्या शिक्षणाच्या हक्काच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने त्यासंबंधीचा कायदा करणे गरजेचे होते. त्यानुसार भारतीय संसदेने 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' संमत केला. १ एप्रिल, २०१० पासून हा अधिनियम कार्यान्वित झाला. त्यानंतर भारत सरकारने ९ एप्रिल, २०१० रोजी 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०१०' राजपत्रात प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र सरकारनेही वरील अधिनियमाला अनुसरून ११ ऑक्टोबर, २०११ रोजी 'महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११' प्रसिद्ध केले.